वाचले :-

१) श्री. सायरचंद मोतीलाल जैन व इतर ५ यांचा रा. चाळीसगांव ता. चाळीसगांव दि. १४.३.२०११व १५.९.२०११ रोजीचा अर्ज

२) तहसिलदार, चाळीसगांव यांचेकडील पत्र क्रं. जमिन-१/अकृषी/एसआर/३८/२०११ दि. ४.५.२०११

३) सहाय्यक संचालक नगररचना,जळगांव यांचेकडील पत्र क्रं .बिशेप/मौजे टाकळी प्र.चा ता. चाळीसगांव/ग.नं.९/ससं-जळ/१०४० दि. २०.४.२०११

४) महाराष्ट्र शासन निर्णय क्रं.एन.ए.पी.१०/२०००/प्र.क्र.१५/ल-२ दि.९.२.२०००

५) कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं. चाळीसगांव यांचेकडील पत्र ०२०८६ दि. ३०.४.२०११

६) भूसंपादन शाखा जि.का.जळगांव यांचेकडील दि. २.५.२०११ रोजीचा नाहरकत दाखला.

७) कार्यकारी अभियंता, सा.बा. विभाग, जळगांव जि.जळगांव यांचेकडील पत्र क्रं. साबांविज/रेशा / ३३११/सन २०११ दि. २५.४.२०११

---------------------------------- ००० ----------------------------------

क्र/जमीन/२/२६/एस आर /३१/२०११
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय.
जळगांव दिनांक :- २१ /११/२०११

आदेश

श्री. सायरचंद मोतीलाल जैन व इतर ५ रा.चाळीसगांव ता.चाळीसगांव जि. **जळगांव** यांनी त्यांच्या/सामाईक मालकीच्या मौजे **टाकळी प्र.चा ता.चाळीसगांव** जि.जळगांव येथील **गट नं. ९ चे एकूण २११००.०० चौ.मी. क्षेत्रास रहिवास** या **प्रयोजनासाठी** बिनशेती परवानगीची मागणी केलेली आहे. अर्जदार यांनी स्टेट बॅक शाखा, **चाळीसगांव** येथे **दि.** १४.१०.२०११ रोजी चलन क्रं. १२३ व शासनाची गा.न.नं.९ (रोजकिर्द) पावती क्र. १५२३५२७ दि. १४.१०.२०११ अन्वये **बिनशेती सारा र.रू.- २११०/-, उपकर र. रु. १६८८०/- मोजणी फी रु. ३६०००/- अशी एकूण र. रू. ५४,९९०/-** सरकारी खजिन्यांत जमा केलेली आहे. विषयांकित जमीनीस बिनशेती परवानगी देणेकामी, कार्यकारी अभियंता, म.रा. वि.वि.कं. चाळीसगांव ,कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगांव, भूसंपादन शाखा जि.का. यांनी नाहरकत दाखला दिलेला आहे. सहाय्यक संचालक नगररचना, जळगांव यांनी प्रश्नाधिन जमीनीस रहिवास बिनशेती परवानगी देणेकामी शिफारस केलेली असून अभिन्यास मंजूर केलेले आहेत.

थास्तव मी, **जिल्हाधिकारी,जळगांव** महाराष्ट्र जमीन महसूल अधियिम १९६६ चे कलम ४४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार,**श्री. सायरचंद मोतीलाल जैन व इतर ५ रा.चाळीसगांव ता.चाळीसगांव जि. जळगांव** यांनी त्यांच्या/सामाईक मालकीच्या मौजे **टाकळी प्र.चा ता.चाळीसगांव** जि.जळगांव येथील **गट नं. ९ चे एकूण २११००.०० चौ.मी. क्षेत्रास रहिवास** या **प्रयोजनासाठी बिनशेती** परवानगी खालील अटी/ शर्तीवर देत आहे.

अटी / शर्ती

१) प्रस्तुतची बिनशेती परवानगी जमिन महसूल अधिनियम व त्या खालील नियमातील तरतुदींच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

२) ज्या प्रयोजनासाठी बिनशेती परवानगी देण्यांत आली आहे. त्याच प्रयोजनसाठी परवानगी धारकाने प्रश्नाधिन क्षेत्राचा वापर करावा. वापरात बदल करणेपूर्वी जिल्हाधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.

३) अर्जदाराने प्रस्तूतच्या जमिनीत सदरच्या आदेशापासून एक वर्षाचे आंत बिनशेतीचा वापर सुरु करावा.अन्यथा सदरची परवानगी आपोआप रद्द समजणेत येईल.

४) परवानगी धारकास या आदेशाव्दारे मंजूर रेखांकन नकाशातील भूखंडाचे पोटहिस्से जिल्हाधिकारी यांच्या पूर्व परवानगी शिवाय करता येणार नाही.

५) प्रश्नाधिन क्षेत्रातील इमारत बांधकामाचे आराखडे महानगरपालिका/ नगरपालिका/ उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयाकडून मंजूर करुन घ्यावे व सदरचे बांधकाम सोबत जोडलेल्या मंजूर रेखांकन आराखडयानुसारच करावे.

६) मंजूर रेखांकन आराखडयांत जिल्हाधिकारी यांच्या अगाऊ परवानगीशिवाय कोणताही बदल करता येणार नाही.

७) प्रस्तूत जमिनीत गटार ,अंतर्गत रस्ते,जोडरस्ते इत्यादी पूर्ण करुन स्थानिक प्राधिकरणाचे ताब्यांत दिल्याशिवाय भूखंडाची विक्री करता येणार नाही.

८) सदरहू अभिन्यासातून जाणाऱ्या १८.० मीटर रुंद परिघक्षेत्र नकाशा रस्त्याखालील क्षेत्र स्थानिक प्राधिकरणास नाममात्र रु.१/- या शुल्कावर हस्तांतरीत करणे अर्जदारास बंधनकारक राहील.

९) महाराष्ट्र जमिन महसूल (जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी) नियम,१९६९ मधील परिशिष्ट २ मध्ये नमुद केल्याप्रमाणे बांधकामाच्या नियमांचे पालन करावे.

१०)प्रश्नाधिन जमिनीचा ज्या तारखेपासून बिनशेती वापर सुरु केलेला आहे. त्या तारखेपासून क्षेत्र **१३६१३.७७**चौ.मि.एवढया **रहिवास** वापराच्या क्षेत्रावरील प्रतिवर्षी भूधारक/भूखंडधारक यांनी प्रति चौ.मी.ला रु.पै. ०.१० दराने बिनशेती सारा भरावा लागेल. सदरचा बिनशेती दर हा सुधारीत दर लागू होतोपावेतो अंमलात राहील. त्यानंतर दरात काही सुधारणा झाल्यास सुधारीत दराप्रमाणे आकारणी करणेत येईल. ती पुर्वलक्षी प्रभावाने करणेत येईल.

११)आदेशात नमूद केलेले क्षेत्राची अकृषिक आकारणी प्रत्यक्षात मोजणी झाल्यानंतर त्याप्रमाणे बदलणेस पात्र राहील.

१२)अर्जदारांनी प्रश्नाधिन बिनशेतीचा वापर सूरू केलेपासून ३० दिवसाचे आत याबाबत संबंधित तलाठी यांचेमार्फत **तहसीलदार, चाळीसगांव** यांना कळवावे तसे न केल्यास महाराष्ट्र जमीन महसूल (जमीनीच्या वापरात बदल व बिगरशेती आकारणी) नियमावली, १९६९ यातील गियम ६ अन्वये कारवाईस पात्र राहील.

१३)भूधारक/भूखंडधारक यांनी महाराष्ट्र जमिन महसूल (जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी) नियम,१९६९ मध्ये परिशिष्ट ४-५ मध्ये नमूद केलेल्या विहीत नमुन्यांत सनद, बिनशेती वापरास सुरुवात केलेपासून ३ महिन्यांत तयार करुन द्यांवी लागेल.

१४)विकासापूर्वी प्रश्नाधिन जमिनीतील भूखंडाची विक्री केल्यास ती बेकायदेशिर ठरेल.

१५)रेखांकनातील **लाल रंगानी** दर्शविलेल्या दुरुस्तीस अधिन राहून सदरची परवानगी देणेत येत आहे.

१६)रेखांकन नकाशात दर्शविल्याप्रमाणे क्षेत्र **२०४०.४२** चौ.मी. एवढे कायम स्वरुपी **खुले** व ४७४४.८१ चौ.मी. एवढे क्षेत्र **रस्त्यासाठी** तसेच रेखांकन नकाशातील रस्ते व गटारी विकसीत करुन स्थानिक प्राधिकरणाच्या ताब्यांत द्यांवे

१७)अंतर्गत रस्ते सभोतालचे जमिनींना प्रवेश मार्ग म्हणून वापरु देणे आवश्यक आहे.

१८)लगतचे भूधारकास सुविधेत बाधा येणार नाही याची दक्षता घ्यावी.

१९)स्थानिक प्राधिकरणाचे नियमानुसार सांडपाणी,पिण्याचे पाण्याची व्यवस्था करणे बंधनकारक राहील.

२०)भुखंडातील कोणतेही विकसनाचे काम प्राधिकरणाचे पूर्व परवानगीशिवाय करु नये.

२१)लगतच्या भूखंडातील रेखांकनातील रस्त्यांशी या रेखांकनातील रस्ते जुळवून घ्यावेत.

२२)जागेवर प्रत्यक्ष बांधकाम करण्यापूर्वी महानगरपालिका/ नगरपालिका/ ग्रामपंचायत/ यांचेकडून बांधकामाची परवानगी घेण्यांत यावी.

२३)इमारतीचे बांधकाम करतांना बांधकाम साहित्यांत प्लॉय ॲश विटा व प्लॉय ॲश आधारीत साहीत्याचा वापर करावा.

COLLECTOR J जिल्ह

२४)सभोवताली व खुल्या जागेत झाडे लावण्यांत यावीत.

२५)सदर प्रकरणांत एकत्रिकरण/बांधकाम अभिन्यास नकाशांना बिनशेती मंजूरीची शिफारस करतांना अर्जदार यांनी प्रकरणासोबत दाखल केलेले मालकी हक्कांचे कागदपत्रे व इतर कागदपत्रे ग्राहया धरण्यात आली आहेत. सदर कागदपत्रे भविष्यात दिशाभूल करणारे आढळून आल्यास सदर एकत्रिकरण/बांधकाम नकाशांना दिलेली सदरची बिनशेती परवानगी रद्द करण्यात येईल.

२६)ही परवानगी,कुळकायदा,ग्रामपंचायत कायदा ,म.न.पा.व नगर पालिका अधिनियम, तसेच बिनशेतीशी निगडीत असलेल्या इतर सर्व कायद्याच्या तरतूदीस अधिन राहण्यांचे अटींवर देण्यांत येत आहे.

२७)वरीलपैकी कुठल्याही अटी / शर्तीचा भंग झाल्यास परवानगी रद्द करण्यांत येईल.

स्वाक्षरीत/-
(ज्ञा. स. राजुरकर)
जिल्हाधिकारी जळगांव.

प्रतः- **श्री. सायरचंद मोतीलाल जैन व इतर ५ रा.चाळीसगांव ता.चाळीसगांव जि. जळगांव**

प्रत :- तहसिलदार, चाळीसगांव

२/-मौजे **टाकळी प्र.चा ता.चाळीसगांव** जि.जळगांव येथील **गट नं. ९ चे एकूण २११००.०० चौ.मी. क्षेत्रास रहिवास या प्रयोजनासाठी** अकृषिक परवानगी देणेत येत असून याबाबत ता.नं.नं.२ मध्ये योग्य त्या नोंदी घ्याव्यात व अर्जदाराकडून विहीत नमुन्यांत सनद तयार करुन घ्यावी. सनदेत वरील सर्व अटी समाविष्ट कराव्यांत.

प्रत :- जिल्हाधिकारी यांची अंतर्गत लेखा परिक्षक पथक शाखा,जळगांव

प्रत :-जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख **जळगांव**/ उपअधिक्षक भूमि अभिलेख **चाळीसगांव** यांचेकडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत :- सहाय्यक संचालक नगररचना,जळगांव

प्रत :- तलाठी **टाकळी प्र.चा. ता. चाळीसगांव** जि.जळगांव

२/- या आदेशाची दप्तरी नोंद घेण्यांत यावी.

प्रत :- सह जिल्हा निबंधक वर्ग-१ जळगांव/ दुय्यम निबंधक चाळीसगांव यांना माहिती व कार्यवाहीसाठी

प्रत :- निवडनस्ती जमीन-२

जिल्हाधिकारी जळगांव करिता